





सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २२६ • शुक्रवार दि.५ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## साहेबराव कांबळे,शैलेश अग्रवाल यांची काँग्रेसमधून हकालपट्टी

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेणारे यवतमाळ मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार साहेबराव कांबळे आणि चंद्रपूर मतदारसंघातील उमेदवार शैलेश अग्रवाल यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्ष नेतृत्वाला अंधारात ठेवून अर्ज मागे घेतल्याने दोन्ही उमेदवारांवर कारवाई करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही कारवाई केली असून या दोघांचे पक्ष सदस्यत्वही रद्द करण्यात आले आहे.

# मराठा आरक्षण आंदोलनातील मृतांच्या वारसांना मदत मंजूर

## नांदेड जिल्ह्यातील तीन कुटुंबियांना होणार लाभ



मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची मागणी अखेर राज्य सरकारने मान्य केली असून, आठ जिल्ह्यांतील ३४ मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथील आंदोलनादरम्यान हा मुद्दा ठामपणे उपस्थित केला होता.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात झालेल्या विविध आंदोलनांमध्ये एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. या मृतांच्या वारसदारांसाठी राज्य सरकारने यापूर्वीच २७ कोटी ५० लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली होती. मात्र, ३४ कुटुंबांना मदत मिळणे बाकी होते. त्यानंतर जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही दिली होती. राज्य सरकारने गेल्या दोन दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करत या ३४ वारसदारांसाठी निधी मंजूर केला आहे. मंजूर लाभार्थ्यांमध्ये बीड जिल्ह्यातील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूर १ वारसदारांचा समावेश आहे. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, आंदोलनादरम्यान सरकारने दिलेल्या आश्वासनांची टप्प्याटप्प्याने पूर्तता करण्यात येत असून, उपसमितीच्या बैठकीत मराठा समाजाच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली आहे. त्यानुसार संबंधित विषयांवर वेगाने कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. मनोज जरांगे पाटील यांना देण्यात आलेली सर्व आश्वासने माध्यमांसमोरच देण्यात आली आहेत. कोणतेही आश्वासन गुप्तपणे देण्यात आलेले नाही. मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका सरकारची कायम असून, त्यानुसारच निर्णय घेतले जात आहेत, असे फडणवीस यांनी म्हटले. मराठा आरक्षण आंदोलनातील मृतांच्या कुटुंबांना मदत मंजूर झाल्याने आंदोलनकर्त्यांच्या वारसांना मोठा दिलासा मिळाला असून, मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख मागण्यांपैकी एक मागणी पूर्ण झाल्याचे मानले जात आहे.

## जिल्ह्यात दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी शुक्रवार दि. ५ जून रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि.५ व ८ जून या दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे.

हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## आई व लेकीचा संशयास्पद मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील वजिराबाद भागात राहणाऱ्या आई व एका मुलीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना आज (शुक्रवार) सकाळी उघडकीस आली आहे.

वजिराबाद भागातील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पाठीमागे काजल विजय जाधव (वय ३२) ह्या आपली मुलगी विशाखा (वय १२) हीच्या सोबत राहत्या होत्या. काजल जाधव ह्या कौठा भागातील यशोसाई हॉस्पीटलमध्ये परिचारिका म्हणून काम करीत असत. गेल्या काही वर्षापासून पती पासून विभक्त राहत असत. आज (शुक्रवार) सकाळी काजल जाधव व विशाखा या दोघी माय-लेकी घराबाहेर पडल्या नाहीत. शेजारी राहणाऱ्यांनी घराबाहेरुन आवाज दिला. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शेजारी एकत्र जमा झाले. त्यांनी घराचा दरवाजा मोडून आतमध्ये प्रवेश केला. तेव्हा दोघीही आई व मुलगी झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्या. शेजाऱ्यांनी त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु दोघ्याही माय-लेकीचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती वजिराबाद पोलीस स्टेशनला देण्यात आली. तात्काळ पोलीस अधिकारी व कर्मचारी रुग्णालयात दाखल झाले. दोघींचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. आई व मुलीच्या संशयास्पद मृत्यूमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# कर्नाटकात शिवकुमार सरकारमध्ये बंडाचे संकेत

## खातेवाटपावरुन दोन ज्येष्ठ मंत्री नाराज

बेंगळुरू : कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी शपथ घेतल्यानंतर काही दिवसांतच त्यांच्या सरकारसमोर पक्षांतर्गत नाराजीचे मोठे संकट उभे राहिले आहे. मंत्रिमंडळातील दोन ज्येष्ठ मंत्र्यांनी खातेवाटपावर उघड नाराजी व्यक्त करीत बंडाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे कर्नाटकातील काँग्रेसमध्ये खदखद वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

अडीच वर्षापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत कर्नाटकातील मतदारांनी काँग्रेसला भरभरुन मतदान केले. सत्ता स्थापनेच्यावेळी मुख्यमंत्रीपदावरुन वादळ उठले होते परंतु अडीच-अडीच वर्षाचा फॉर्म्युला निश्चित केल्यानंतर काही दिवसांपूर्वी डी.के.शिवकुमार यांनी मुख्यमंत्री पदाची सुत्रे हाती घेतली. मंत्रीमंडळाचा विस्तार अवघ्या दोन-चार दिवसांपूर्वी पार पडला. ज्येष्ठ काँग्रेस नेते के. एच. मुनियप्पा यांनी त्यांना देण्यात आलेल्या अन्न व नागरी पुरवठा खात्याचा पदभार स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला आहे. खातेवाटपात ज्येष्ठ नेत्यांच्या अनुभवाला आणि योगदानाला न्याय मिळालेला नसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यापूर्वीच आणखी एक ज्येष्ठ मंत्री रामलिंगा रेड्डी यांनीही खातेवाटपावर नाराजी व्यक्त करत राजीनाम्याचा इशारा दिला होता. त्यामुळे नव्या सरकारच्या स्थैर्याबाबत चर्चांना उधाण आले आहे. देवनहळ्ळी येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना मुनियप्पा म्हणाले, पक्षाने ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान राखला पाहिजे. खातेवाटपातील त्रुटी पक्षश्रेष्ठींनी दुरुस्त कराव्यात. तोपर्यंत मी मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारणार नाही. सात वेळा लोकसभेवर निवडून गेलेले मुनियप्पा हे केंद्र सरकारमध्ये मंत्री म्हणूनही कार्यरत होते. सध्या ते देवनहळ्ळी मतदारसंघाचे आमदार असून राज्यातील प्रभावशाली दलित नेत्यांपैकी एक मानले जातात.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी धर्माबाद बंद आंदोलनाला उत्स्फुर्त प्रतिसाद

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने आज (शुक्रवार) दि.५ जून रोजी पुकारण्यात आलेल्या धर्माबाद बंद आंदोलनाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे.

धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना तात्काळ विमा वाटप करण्यात यावा. बियाणे व खताचा काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करण्यात यावे. शेतकऱ्यांच्या शेती पंपासाठी नियमित वीज पुरवठा करणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी मधील जाचक अटी रद्द कराव्यात, पीकविमा न भरलेल्या शेतकऱ्यांना २५ हजार रुपये हेक्टरी मदत द्यावी व इतर मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने धर्माबाद बंदची हाक देण्यात आली. हुतात्मा पानसरे चौकात शासनाच्या फसव्या कर्जमाफीच्या जीआरची शेतकऱ्यांनी होळी केली. त्यानंतर भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभेनंतर करण्यात आला. धर्माबाद बंद आंदोलनात व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला होता. बंद दरम्यान कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी चौक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# विष्णुपुरीतील चौकात युवकाचा खून

नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी येथील प्रसिद्ध काळेश्वर मंदिरातील सायंकाळची आरती करुन घरी परत जाणाऱ्या एका युवकास गावातील चौकात गाठून चार जणांनी प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात गंभीर झालेल्या युवकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असून या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

विष्णुपुरी येथील अर्जुन तातेराव हंबर्डे (वय ३१) हा युवक गुरुवारी सायंकाळी काळेश्वर मंदिरात आरतीसाठी गेला होता. आरती आटोपून घरी पायी जात असतांना रात्री साडेआठच्या सुमारास गावातील एका चौकात चार जणांनी अर्जुन हंबर्डे यास अडविले. जुन्या वादातून हंबर्डे याच्यावर तीक्ष्ण हत्यारांनी वार करण्यात आले. या हल्ल्यात अर्जुन हंबर्डे हा गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला गावातील नागरिक व नातेवाईकांनी तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. परंतु आज पहाटेच्या सुमारास हंबर्डे याचा मृत्यू झाला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीसांनी प्रविण हंबर्डे, शेख आरीफ, चैतन्य पांचाळ व सुरज तगडे या चार जणांना ताब्यात घेण्यात आले असून या घटनेचा तपास पोलीस करीत आहेत.

# पंचशील प्रतिष्ठानच्या चौथ्या सामूहिक मंगल परिणय मेळाव्यात २७ जोडपे विवाहबद्ध

नांदेड/प्रतिनिधी- पंचशील प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने आयोजित चौथ्या सामूहिक मंगल परिणय मेळावा चांदोजी पावडे मंगल कार्यालय येथे आज (शुक्रवार) दि.५ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. या मंगल परिणय मेळाव्यामध्ये २७ जोडपे परिणयबद्ध झाले. नवदाम्प्त्यांना आशिर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने बौद्ध उपासक व उपासीका उपस्थित होते.




सामाजिक समता, बंधुता एकतेचा संदेश देत समाजातील गोरगरीब,कष्टकरी, सर्वसामान्य जनतेचा विवाहासाठी होणारा अनाठायी खर्च वाचावा, तोच पैसा समाजाने आपल्या परिवाराचे जीवनमान उंचावण्यासाठी खर्च करावा यातून समाजामध्ये एकी,आपुलकी,प्रेम, सहानुभूती वाढावी या उदात्त

पान ४ वर

# जॅकवेल दुरुस्तीमुळे माहूर शहराचा पाणीपुरवठा तीन दिवस बंद राहणार

माहूर/प्रतिनिधी- माहूर नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नदीवरील जॅकवेल येथे मान्सूनपूर्व आवश्यक दुरुस्ती व देखभाल कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामामुळे शहराचा पाणीपुरवठा पुढील तीन दिवस बंद राहणार असल्याची माहिती नगरपंचायतीकडून देण्यात आली आहे.

जॅकवेलवरील दुरुस्ती व देखभाल कामे सुरळीत आणि सुरक्षितपणे पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढा पाणीसाठा करून ठेवावा तसेच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. नगरपंचायतीने स्पष्ट केले आहे की, दुरुस्तीची कामे पूर्ण होताच शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. दरम्यान, पाणीपुरवठा खंडित राहिल्याने नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल प्रशासनाने दिलगीर व्यक्त केली आहे. शहराच्या दीर्घकालीन आणि सुरळीत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने ही दुरुस्ती आवश्यक असल्याने सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन माहूर नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. नगराध्यक्ष फिरोज भैया दोसानी आणि मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# जागतिक पर्यावरणदिनी ‘हरित नांदेड’ अभियानास सुरुवात



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन दि.५ जुन रोजी महापालिकेच्या विसावा उद्यान येथील आयोजित कार्यक्रमात हरित नांदेड अभियानास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विविध सामाजिक संस्था व वृक्षमित्र फाउंडेशनचे प्रतिनिधी सुध्दा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मागील आठ वर्षापासुन लोकसहभागातुन वृक्ष लागवड संगोपनाचे कार्य सुरु असुन मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतुन हरित नांदेड उपक्रमा अंतर्गत २०२६ च्या मान्सुन मध्ये महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा हद्दीत एकुण १८००० वृक्ष लागवड करण्यात येणार असुन या अभियानाची सुरुवात पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन दि. ५ जुन रोजी विसावा उद्यान येथे वृक्षरोपण करुन करण्यात आली आहे. नांदेड शहराचे वाढलेले तापमान नियंत्रित करण्यासाठी सर्व सामाजिक संस्था एकवटल्या असुन नियोजनबध्द कार्यक्रमातुन वृक्षांची लागवड करुन त्यांचे संवर्धन करण्यासाठी महापालिका प्रशासन, वृक्षमित्र फाउंडेशन, गुरुव्दारा लंबर साहेब व शहरातील विविध सामाजिक संस्था एकवटल्या आहेत. येणाऱ्या काळात शहरातील विविध भागात वृक्षरोपण करुन लागवड करण्यात आलेले वृक्ष जोपासण्याच्या दृष्टीकोणातुन सामाजिक संघटने मार्फत ट्री गार्ड, ठिबक सिंचन, तार फेंसिंग इत्यादी आवश्यक बाबींची पुर्तता केली जाणार आहे. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, मुख्य उद्यान अधिक्षक डॉ.मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, रावण सोनसळे, राजेश जाधव, गौतम कवडे, निलावती डावरे, वृक्षमित्र फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष मुगटकर, सतीश कुलकर्णी, शैलेंद्र क्षिरसागर, नरेश यन्नावार, रवि रणखांब, कैलास अमिलकंठवार, प्रितम भराडिया यांच्यासह मोठ्या प्रमाणात पर्यावरण प्रेमी नागरीक, संस्था प्रतिनिधी, मनपा कर्मचारी व वृक्षमित्र यांची उपस्थीती होती.



# बिनविरोध विजयाचे राजकारण

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील निवडणुकांनी मतदानापूर्वीच अनेक राजकीय संदेश दिले आहेत. एकूण १७ रिक्त जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असताना उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यात पाच जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे उर्वरित जागांवरील लढतींचे महत्त्व कायम असले, तरी या बिनविरोध विजयाने राज्याच्या सध्याच्या राजकीय वास्तवावर स्पष्ट प्रकाश टाकला आहे. महायुतीने आपल्या संघटनात्मक ताकदीचे प्रदर्शन घडवून आणले आहे, तर महाविकास आघाडीसमोर अस्तित्व टिकविण्याचे आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुका या नेहमीच वेगळ्या स्वरूपाच्या असतात. या निवडणुकांमध्ये सामान्य मतदार मतदान करत नाहीत. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगर परिषद, नगरपंचायत आणि महानगरपालिका यांमधील निवडून आलेले सदस्य हेच मतदार असतात. त्यामुळे या निवडणुकांचा निकाल हा पक्षांच्या स्थानिक पातळीवरील प्रभावाचा आणि संघटनात्मक क्षमतेचा निर्देशांक मानला जातो. राज्यातील सत्तासमीकरणांचा आरसा म्हणूनही या निवडणुकांकडे पाहिले जाते. गेल्या काही वर्षांत महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले वर्चस्व वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. भाजपची संघटनात्मक ताकद, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा स्थानिक स्तरावरील प्रभाव आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची काही भागांतील मजबूत पकड यांचा परिणाम या निवडणुकीत दिसून येत आहे. उमेदवार निवडीपासून ते जागावाटपापर्यंत महायुतीने तुलनेने शिस्तबद्ध भूमिका घेतली. परिणामी अनेक ठिकाणी विरोधकांना प्रभावी आव्हान उभे करता आले नाही. काही ठिकाणी विरोधी उमेदवारांनी माघार घेतली, तर काही ठिकाणी उमेदवारीबाबतच अनिश्चितता निर्माण झाली. याचा थेट लाभ सत्ताधारी आघाडीला मिळाला. दुसरीकडे महाविकास आघाडीच्या अडचणी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन पक्ष एकत्र असले तरी स्थानिक पातळीवर त्यांचा समन्वय अनेकदा कमकुवत पडतो. प्रत्येक मतदारसंघात स्थानिक नेतृत्व, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि पक्षांतर्गत स्पर्धा यांचा परिणाम उमेदवारीवर होतो. त्यामुळे एकसंध रणनीती राबविण्यात अडथळे निर्माण होतात. या निवडणुकीतही काही ठिकाणी विरोधी पक्षांच्या खात्रीशीर उमेदवारांनी माघार घेतल्याने महाविकास आघाडीची राजकीय प्रतिमा धक्का बसलेली दिसते. तथापि, या चित्राकडे केवळ सत्ताधाऱ्यांच्या यशाच्या दृष्टीने पाहणे पुरेसे ठरणार नाही. लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीतील स्पर्धेत असते. निवडणूक म्हणजे फक्त विजय मिळविण्याचे साधन नव्हे; ती विचारांची, धोरणांची आणि नेतृत्वाची कसोटी असते. मतदारांसमोर पर्याय उपलब्ध असणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. जेव्हा मोठ्या प्रमाणावर जागा बिनविरोध निवडल्या जातात, तेव्हा स्पर्धेचा आत्माच काहीसा कमी होतो. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील राजकीय चैतन्यही कमी होण्याचा धोका असतो. अर्थात, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमध्ये महायुतीचे संख्याबळ अधिक असल्याचे वास्तव नाकारता येणार नाही. अनेक जिल्ह्यांत सत्ताधारी पक्षांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने निवडून आलेले आहेत. त्यामुळे या निवडणुकांमध्ये त्यांना नैसर्गिक आघाडी मिळणे अपेक्षितच होते. मात्र विरोधकांनी संघर्ष टाळणे किंवा लढती उभ्याच न करणे हा लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. पराभवाची शक्यता असली तरी राजकीय पक्षांनी आपली भूमिका, विचार आणि नेतृत्व मतदारांसमोर मांडण्यासाठी मैदानात राहणे आवश्यक असते. या निवडणुकांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रंगीत तालीम. विधान परिषद निवडणुकीत दिसलेली राजकीय समीकरणे पुढील काळात जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांमध्येही प्रभाव टाकू शकतात. त्यामुळे सत्ताधारी आघाडीसाठी हा आत्मविश्वास वाढविणारा टप्पा असला, तरी विरोधकांसाठी तो धोक्याची घंटा ठरू शकतो. एकंदरीत, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील बिनविरोध विजयाने महायुतीची राजकीय पकड अधोरेखित केली आहे. परंतु या यशाइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विरोधकांच्या कमकुवत होत चाललेल्या लढाऊ वृत्तीचा. लोकशाहीत विजय महत्त्वाचा असतो; पण त्याहून महत्त्वाची असते स्पर्धा. कारण मजबूत सत्तेसोबत सक्षम विरोधकही तितकेच आवश्यक असतात. अन्यथा निवडणुका केवळ औपचारिकता बनण्याचा धोका निर्माण होतो आणि लोकशाहीचे खरे सौंदर्य हरवून बसते.**

# एल निनोचे सावट आणि महाराष्ट्रासमोरील पावसाचे आव्हान:एक भूगर्भशास्त्रीय व हवामान शास्त्रीय विश्लेषण

## जागतिक पर्यावरण दिन विशेष

आज ५ जून, म्हणजेच 'जागतिक पर्यावरण दिन'. हा दिवस आपण पृथ्वीचे रक्षण आणि निसर्गाचा समतोल राखण्याची शपथ घेण्यासाठी साजरा करतो. मात्र, यंदाचा पर्यावरण दिन आपल्यासाठी केवळ एक उपचार न राहता, एका मोठ्या नैसर्गिक आव्हानाची जाणीव करून देणारा ठरणार आहे. या वर्षी संपूर्ण भारतासह आपल्या महाराष्ट्रावर 'एल निनो' चा गडद प्रभाव पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, सरासरीच्या तुलनेत केवळ ९०% पाऊस पडण्याचा अंदाज आहे. हवामानशास्त्र आणि भूगर्भशास्त्र या दोन्ही दृष्टिकोनातून या परिस्थितीचा अभ्यास करणे आणि त्यानुसार पावले उचलणे आता काळाची गरज बनली आहे.

जागतिक हवामान चक्रावर सर्वाधिक परिणाम करणारी एक महत्त्वाची घटना म्हणजे 'एन्सो' (ENSO-El Nio Southern Oscillation). भूगर्भशास्त्र आणि हवामानशास्त्राच्या दृष्टीने हे समुद्र आणि वातावरण यांच्यातील परस्पर संबंधातून निर्माण होणारे चक्र आहे. स्पॅनिश भाषेत 'एल निनो' या शब्दाचा अर्थ 'लहान मुलगा' असा होतो. जेव्हा प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय भागातील पाण्याच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते (म्हणजेच समुद्र गरम होतो), तेव्हा त्याला 'एल निनो' म्हणतात. समुद्राच्या या अतिरिक्त उष्णतेमुळे जागतिक हवामान चक्रात बदल होतो आणि याचा थेट परिणाम मान्सूनच्या वाऱ्यांवर होऊन, भारतासारख्या देशांमध्ये मान्सून कमकुवत होतो व दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.


याच्या अगदी उलट परिस्थिती म्हणजे 'ला निना' होय. जेव्हा प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्त थंड होते, त्याला हवामानशास्त्रात 'ला निना' म्हणतात. यामुळे मान्सूनचे वारे अधिक गतिमान होतात आणि भारतात सरासरीपेक्षा जास्त आणि चांगला पाऊस पडतो. थोडक्यात सांगायचे तर, 'ला निना' हा भारतासाठी सुखावह आणि समृद्धी आणणारा असतो, तर 'एल निनो' हा नेहमीच चिंतेचा आणि आव्हानाचा विषय ठरतो.

गेल्या काही वर्षांत आपण 'ला निना'चा प्रभाव अनुभवल्यामुळे देशात व राज्यात चांगला पाऊस झाला होता. मात्र, या वर्षी प्रशांत महासागरात 'एल निनो' पूर्णपणे सक्रिय झाला आहे. जागतिक हवामान मॉडेल्सनुसार, मध्य आणि पूर्व प्रशांत महासागराचे तापमान लक्षणीयरीत्या वाढले आहे, ज्यामुळे भारताकडे येणारे मान्सूनचे वारे कमकुवत झाले आहेत. यामुळेच देशात आणि महाराष्ट्रात यंदा सरासरीपेक्षा कमी, म्हणजेच जवळपास ९०% पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

महाराष्ट्राचा विचार केल्यास, या एल निनोचा प्रभाव राज्याच्या वेगवेगळ्या भागांवर वेगवेगळ्या तीव्रतेने आणि विदारकतेने



दिसणार आहे. पहिली मुख्य चिंता म्हणजे पावसाची अनिश्चितता आणि खंड होय. ९०% पावसाचा अर्थ असा नाही की पाऊस सतत संथ गतीने पडेल, तर पावसाचा वितरणाचा पॅटर्न पूर्णपणे बदलेल. यामध्ये पावसाच्या दोन नक्षत्रांमध्ये मोठा खंड पडू शकतो, ज्यामुळे पिके जळण्याचा धोका वाढतो.



**प्रा.आकाश करंडे**
सायन्स कॉलेज,नांदेड.

भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर महाराष्ट्राचा मोठा भाग, विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र हा 'डेक्कन ट्रॅप' म्हणजेच कठीण बेसाल्ट खडकाचा बनलेला आहे. या खडकांमध्ये पाणी साठवून ठेवण्याची आणि मुरण्याची नैसर्गिक क्षमता अत्यंत मर्यादित असते. जर पाऊस सलग न पडता खंडित पडला किंवा अत्यंत कमी पडला, तर भूगर्भातील जलसाठे वेळेवर रिचार्ज होणार नाहीत. याचा परिणाम असा होईल की, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यापासूनच ग्रामीण व शहरी भागातील कूपनलिका आणि विहिरींची पातळी खालावून त्या कोरड्या पडू लागतील.या परिस्थितीचा सर्वाधिक फटका मराठवाडा आणि विदर्भाला बसण्याची शक्यता आहे. नांदेडसह संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये आधीच भूगर्भातील पाण्याची टंचाई जाणवत असते. एल निनोमुळे या भागात जून-जुलैमध्ये वेळेवर पाऊस न झाल्यास खरीप हंगामाच्या पेरण्या लांबणीवर पडतील किंवा शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल.

या आव्हानात आणखी एक भर पडणार आहे ती म्हणजे उष्णतेच्या लाटांची. मान्सून उशिरा आल्यामुळे आणि सुरुवातीला कमी पावसामुळे जून महिना उजाडला तरी हवेतील तापमान चढेच राहील. तापमान वाढल्यामुळे भूपृष्ठावरील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होईल आणि धरणांमधील उरलेला पाणीसाठा झपाट्याने कमी होऊन तीव्र पाणीटंचाई निर्माण होईल.एल निनो ही जरी एक नैसर्गिक आणि जागतिक भौगोलिक घटना असली, तरी मानवनिर्मित प्रदूषण, अनिर्बंध जंगलतोड आणि सिमेंटचे वाढते जाळे यामुळे जागतिक तापमानवाढ होऊन या नैसर्गिक घटनांची तीव्रता आता अधिक घातक आणि विनाशकारी बनत चालली आहे.

यंदाच्या या कमी पावसाच्या आणि एल निनोच्या पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी आतापासूनच 'पाणी बजेट' पाळणे अत्यंत आवश्यक आहे. भूगर्भशास्त्रीय दृष्टिकोनातून, उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्यासाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' करणे, विहिरी व कूपनलिकांचे तांत्रिक पुनर्भरण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे अनिवार्य बनले आहे. निसर्गाचा हा धोक्याचा इशारा ओळखून, यंदाचा पर्यावरण दिन केवळ वृक्षारोपणाच्या सोहळ्यापुरता मर्यादित न ठेवता 'जल संवर्धन' आणि 'भूजल रक्षण' या संकल्पनेवर केंद्रित करणे, हेच आपले प्रथम कर्तव्य असले पाहिजे.

# रणझुंजार रिपब्लिकन योद्धा:बापूसाहेब गजभारे

आज ५ जून...आंबेडकरी चळवळीतील आक्रमक नेते बापूराव उर्फ बापूसाहेब गजभारे यांचा जन्मदिन. बहुजन समाजाचा बुलंद आवाज पीपल्स रिपब्लिकन पार्टीची मुलुख मैदानी तोफ तथा नांदेड जिल्ह्याच्या राजकीय पटलावरील चर्चेतील खास चेहरा असे बहुआयामी कृतीशील व्यक्तीमत्त्व असणारे बापूराव गजभारे आपला वाढदिवस दरवर्षी अतिशय साधेपणाने व समाजोपयोगी रचनात्मक उपक्रमांनी विधायक कार्यक्रमांनी साजरा करण्यास प्राधान्य देतात.



कार्यकर्ते व नेते यांच्यात कोणताही दुजाभाव न करता सर्वसामान्यांस सोबत घेऊन आपल्या हसतमुख, मनमिळावू स्वभावाने तमाम कार्यकर्त्यांच्या हृदयावर त्यांनी आपले नाव कोरले आहे. बापूसाहेब गजभारे यांनी असंख्य गरजूंना मदतीचा हात व निराधारांना आधार देऊन सन्मानाने व स्वाभिमानाने जीवन जगण्याचा प्रामाणिक सल्ला देखील आपल्या कार्यकर्त्यांना देतात. बापूसाहेब गजभारे बहुजनांचे अश्रु पुसणारे आंबेडकरी चळवळीतील कल्पक नेतृत्व आहे. वादळी व्यक्तीमत्त्व असल्याने स्वतः तहान, भूक हरवून सर्वसामान्यांच्या मदतीला सातत्याने धावून येतात. नुसते बोलके नेते नसून ते कृतीशील नेते आहेत. प्रचंड लोकप्रियतेचे वलय असताना देखील ते नेहमी कार्यकर्त्यांच्या गराड्यात राहणे पसंद करतात. कार्यकर्त्यांना त्यांचे प्रेरणादायी व्यक्तीमत्त्व परीसाप्रमाणे त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाचे सोने झाल्याशिवाय राहत नाही.

आजतागायत त्यांनी नांदेड नगरीत डॉ. बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक उल्लेखनीय अशा नेत्रदीपक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे संयोजन करुन समाज मनावर एक वेगळीच छाप पाडली आहे. तथागत महानाट्य, धम्माच्या वाटेवर, माता रमाईच्या जीवन चरित्रावर आधारीत मी रमाई बोलते द ग्रेट रिपब्लिकन कार्यकर्ता, ठलवा हा नाट्यप्रयोग, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रवास केलेल्या ऐतिहासिक बैलगाडीचे प्रदर्शन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांच्या जीवन चरित्रावर आधारीत दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन भरविले होते .मागील २४ वर्षापासून दिला जाणारा कृष्णाई पत्रकारिता पुरस्कार व विविध क्षेत्रातील कार्यासाठी दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार सोहळा, राष्ट्रीय पातळीवरील उर्दू हिंदी कवीसंमेलन नांदेड नगरीच्या वैभवात भर टाकणारे अनेकोत्तम देखणे कार्यक्रम तसेच आंतरराष्ट्रीय पंजाबी गायिका गिन्नी माही यांच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाची मेजवाणी नांदेडकरांना उपलब्ध करुन दिली आहे.

बापूसाहेब गजभारे हे २०१७ मध्ये प्रभाग क्रं. १० दत्तनगर मधून नगरसेवक म्हणून प्रचंड मतांनी निवडून येऊन मनपा सभागृहात जनतेचे प्रतिनिधीत्व केले. सदर कार्यकाळात नगरसेवक म्हणून सभागृहात आपल्या कारकिर्दीची छाप पाडली असून त्यांनी महात्मा फुले पुतळा परिसराची मोकळी जागा बिल्डर्स लॉबीच्या घश्यातून काढून कायमस्वरूपी पुतळ्यासाठी ठराव करून आरक्षित केली याबरोबरच महानगरपालिकेची मालमत्ता सर्व्हे नंबर ३१ मधील डंकीन येथील विपश्यना केंद्राच्या बाजुला ५ एकर जागेवर विश्वशांतीचे अग्रदूत महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची १०० फुट उंची अशी भव्यदिव्य मुर्ती उभारण्याचा निर्णय दि. १६ मे २०१८ रोजी बुद्ध जयंतीदिनी ठराव क्रं. ५२ द्वारे मंजूर करून घेतला आहे. सदर ठरावामुळे एक हेक्टर जमीन अर्थात अडीच एकर जमीनवर मुर्ती उभारण्याकरीता मनपाकडून आरक्षित करण्यात आली आहे. नियमानुसार सर्व विभागांच्या नाहरकती उपलब्ध करुन घेऊन मनपाने डीपीआर तयार करुन राज्य शासनाला ८० कोटी रुपयांचा प्रस्ताव आराखड्यासह सादर केला आहे, ही नांदेडकरांसाठी बापूसाहेब गजभारे यांच्या ऐतिहासिक कृतीशील नेतृत्वाची चुणूक दिसून येते.

मनपा सभागृहात विविध प्रश्नांवर सडेतोड भूमिका मांडून अनेक लक्षवेधी प्रश्न उपस्थित करुन सर्वसामान्यांच्या गळ्यातील ताईत बनले. कारण शहरातील वाहतुक व्यवस्थेचा प्रश्न, रस्ते रुंदीकरणाचा प्रश्न, पिण्याचे पाणी वॉटर ऑडीट, मनपा उत्पन्न वाढीचे अनेक विधायक प्रस्ताव मांडले, शहरातील गृह निर्माण हाऊसिंग सोसायटीचे खुले भूखंड, शहरातील नैसर्गिक मोठे नाले त्यावर उच्चभ्रू लोकांनी अतिक्रम केल्या मूळे पावसाचे पाणी लोकांच्या घरात जाते पाण्याचा निर्माण झालेला प्रश्न, अनेक अतिक्रमणे यामुळे तुंबलेल्या पाण्यावर कायमचा तोडगा मनपाला सुचवून प्रशासनाला रचनात्मक दिशा दिली. तसेच उपेक्षित, वंचित घटकातील सर्वसामान्य गरजू लाभार्थ्यांना घरकुलांचे वितरण सुरळीत होण्याकरीता घरकुल वाटपात प्रशासकीय पातळीवर सुसूत्रता आणली. याबरोबरच मनपाचे बहुउद्देशिय सभागृह बीओटी तत्त्वावर देऊ नये म्हणून रान उठवत ठाम भूमिका मांडून सभागृहात प्रखर विरोध दर्शवला. मनपाचे सफाई कामगार, कर्मचारी, अधिकारी, अभियंते यांचे बढती, निलंबन प्रश्न सोडविले आपला कुणी तरी पाठीराखा आहे हि भावना त्यांच्यात निर्माण केली

**मारोती भु.कदम**
नांदेड.

अशा अगणित कामांची यादी सोबत असताना देखील नगरसेवक पदाची यशस्वी वाटचाल असताना सुद्धा प्रभाग क्रं. १० मधून दत्तनगर भागातील जनतेचा प्रचंड लोकाग्रह असताना सुद्धा बापूसाहेब गजभारे यांनी नगरसेवक पदाची निवडणूक स्वतः न लढवता इतरांना संधी उपलब्ध करुन देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले. असे राजकारणात दुर्मिळ आढळून येते.त्यांचा राजकीय प्रवास फारच संघर्षमय आहे. विद्यार्थीदशेपासूनच राजकीय मैदानात उडी घेऊन रामदासजी आठवले यांच्यासमवेत त्यांनी आपले राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. भारिप बहुजन महासंघ ,बीएसपीचे जिल्हाध्यक्ष असताना या कालावधीत मोर्चे, निदर्शने संविधानिक मार्गाने अनेक लोकआंदोलने उभी करुन उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे. श्री सुधारराव डोईफोडे ,डॉ.व्यंकटेश काब्दे ,सदाशिव पाटील यांच्या नेतृत्वात रेल्वे रुंदीकरण, वैधानिक विकास महामंडळातील ,मराठवाडा अनुशेष भरतीबाबत आंदोलन यात सक्रीय सहभाग नोंदवून अनेक वेळा अटक करून घेतली अनेक राजकीय पोलीस केसेस त्यांचेवर झाल्या .डॉ . बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ची इमारत हे त्यांच्या आंदोलनाचे फलित आहे.

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे विद्यमान प्रदेश महासचिव असून केंद्रीय कोअर कमिटीचे सदस्य देखील आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली २०१२ मध्ये नांदेड नगरीत पहिल्यांदाच कृषीउत्पन्न बाजार समिती मैदान येथे पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय महाअधिवेशन संपन्न झाले. रयत रुग्णालयाच्या संचालक मंडळात बापूसाहेब गजभारे असल्याने आरोग्य सेवेत सुद्धा त्यांचे योगदान वाखाणण्याजोगे आहे. अनेक रुग्णांना ते वैद्यकीय सेवा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात हिरीरीने सहभाग नोंदवतात व आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून रयत रुग्णालयातील रुग्णांना चादर वाटप व फळे वाटपाचा कार्यक्रम अनेक वर्षापासून सातत्याने करतात. याबरोबरच क्रीडा क्षेत्रात सुद्धा नवा प्रयोग करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत डॉ.बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने डॉ.बी.आर. आंबेडकर चषक-२०२२ चे कल्पक नियोजन आकाश गजभारे मित्रमंडळाच्यावतीने यशस्वीरित्या जिल्हास्तरीय लेदर बॉल क्रीकेट स्पर्धेचे आयोजन करुन क्रीडा रसिकांना अनोखी पर्वणी उपलब्ध करुन दिली.

सर्व समाजातील जात, धर्म, गट या पलिकडे जाऊन बापूसाहेब गजभारे यांनी आजातशत्रू म्हणून ख्याती निर्माण केली आहे. त्यांच्या परिघात अनेक नामवंत चित्रकार, छायाचित्रकार, लोककलावंत, साहित्यिक, राजकारणी यांना सोबत घेऊन त्यांच्याशी सल्ला- मसलत करुन अनेक समाजोपयोगी विधायक रचनात्मक उपक्रमांना समाजापर्यंत पोहोचवतात. त्यांच्या संकल्पनेतून अनेक समाजोपयोगी उपक्रम आजतागायत निर्विघ्न पार पडले आहेत. समाजकारण आणि राजकारण याचा सुरेख समन्वय साधून सर्व समूहाला सोबत घेऊन त्यांची भावी वाटचाल व राजकीय प्रवास यशस्वी होवो याकरीता जन्मदिनी कोटी- कोटी शुभेच्छा!

# वृक्षारोपण करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा

उमरखेड/प्रतिनिधी- संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रमांतर्गत यावर्षी ठरवण्यात आलेली मध्यवर्ती संकल्पना निसर्गाकडून प्रेरणा हवामानासाठी, आपल्या भविष्यासाठी ही आहे. या मोहिमेअंतर्गत नाऊ फॉर क्लायमेट हा हॅशटॅग वापरून जगभरात पर्यावरण संवर्धनासाठी लोकांनी एकत्र येण्याचे आवाहन केल्या जात असून त्याच अनुषंगाने आज नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था उमरखेड द्वारा वीरशैव लिंगायत मोक्षधाम येथे अर्जून वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

जगभरात ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा होत आहे, हा दिवस पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन याकरिता कटिबद्ध होण्यासाठी जगातील सर्व नागरिकांना प्रेरणा देणारा त्यांना संवेदनशील करणारा आणि जागृत करणारा असावा, असे संयुक्त राष्ट्र संघाच्या पहिल्या मानवी पर्यावरण परिषदेत ठरले या परिषदेचे स्मरण म्हणून दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. प्रत्येक व्यक्तीने




वृक्षारोपणास सहकार्य केल्यास कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण काही प्रमाणात कमी होऊन ऑक्सीजनचे प्रमाण वाढण्यास नक्कीच मदत होईल ही झाडे आपणास ऑक्सिजन फुकट देतात त्या ऑक्सिजन साठी कोरोना संकटात आपल्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागले विकासाच्या नावावर आपण फुकट ऑक्सीजन देणाऱ्या वृक्षांचा खुलेआम कुऱ्हाड चालवून बळी घेत आहोत. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडत असून यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज आहे. नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था उमरखेड द्वारा आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमास संस्थेचे प्रभाकर दिघेवार, नगरसेवक गजानन रासकर, विष्णू दुधेवार, राजेश भोकरे, रवि चांदले,काशीनाथ कुब्डे, , विलास दुधेवार, ईत्यादी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# श्री रेणुकादेवी संस्थान श्री क्षेत्र माहूरगड, ता. माहूर, जि. नांदेड

## नोंदणी क्र.ए.२१८५ (नांदेड) विश्वस्त मंडळ

| | |
|---|---|
| वेब पत्ता : www.shrirenukadevi.in | ई-मेल : shreerenukamataandir@gmail.com |
| शाखाः-आस्था/लेखा/रे.दे.सं./ /२०२६ | दूरध्वनी क्र. : ९८५०३३५३३५ |

दि.०४.०६.२०२६

## :: जाहीर दरपत्रक सूचना ::

विषय : संस्थानच्या दानपेटीतील रोख रक्कम मोजमाप करण्यासाठी स्टील बेंच, स्टील ट्रे व विद्युत विभागासाठी इन्व्हर्टर, बॅटरी व ३०KV जनरेटर पॅनल रिपेअरिंग साहित्य पुरवठ्याचे दरपत्रक मागविण्यात येत असल्याबाबत.

संदर्भः १. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक - ०१ डिसेंबर २०१६
२. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक - ०७ मे २०२१
३. मा. विश्वस्त समितीच्या मान्यतेनुसार.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, संस्थानच्या दानपेटीतील रोख रक्कम मोजमाप करण्यासाठी स्टील बेंच, स्टील ट्रे व विद्युत विभागास इन्व्हर्टर, बॅटरी व ३०KV जनरेटर पॅनल रिपेअरिंग साहित्य पुरवठा करण्याबाबतची कार्यालयाच्या विश्वस्त समितीने कार्यालय स्तरावरून अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात सदरील विभागाचे साहित्य पुरवठा करण्यासाठी निविदा देऊन खालील बाबींच्या दराचे दरपत्रक पुरवठादारांकडून मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठादारांनी खालील तपशीलाप्रमाणे आपले दरपत्रके GST सह या कार्यालयास **जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत बंद लिफाफ्यात** सादर करावे.

**(अंतिम दिनांक : ११.०६.२०२६ पर्यंत सायं.- ०५.०० वाजेपर्यंत)**

| अ.क्र. | पुरवठा करावयाचे पदार्थाचा तपशिल | एकुण लागणारे साहित्य | दर | स्थानिक बाजारातील सरासरी दर प्रमाणे एकुण रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | दर | एकुण रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **स्टील बेंच व ट्रे** | | | | |
| | **स्टील बेंच** | १० नग | प्रतीनग | | |
| | लांबी - ०६ फूट | | | | |
| | रुंदी - १.५ फूट | | | | |
| | उंची - २ फूट /२.५ फूट (Adjustment) | | | | |
| | **स्टील ट्रे** | २० नग | प्रतीनग | | |
| | लांबी - ३ फूट | | | | |
| | रुंदी - १.५ फूट | | | | |
| | उंची - ०.६ इंच | | | | |
| २ | **विद्युत विभाग** | | | | |
| | इन्व्हर्टर (Microtek) ११००W | १ नग | प्रतीनग | | |
| | बॅटरी (Amaron) १५०Am | १ नग | प्रतीनग | | |
| ३ | **३०KV जनरेटर साहित्य** | | | | |
| | Contactor LC1DT80A | ०२ नग | प्रतीनग | | |
| | 10mm Wire 30 Ft. | 30ft | प्रतीनग | | |
| | 10mm Lugj Copper Pin Type | २० नग | प्रतीनग | | |
| | 10mm Lugj | २० नग | प्रतीनग | | |
| | 20mm Lugj | २० नग | प्रतीनग | | |
| | 20mm Lugj | १० नग | प्रतीनग | | |
| | Auto Switch | ०६ नग | प्रतीनग | | |
| | Terminal (Battery) | ०२ नग | प्रतीनग | | |
| | Chikat Tape | ०८ नग | प्रतीनग | | |
| | Transport Charges | | | | |
| | Service Charges | | | | |

दरपत्रकासोबत जोडावयाची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. ते जोडण्यात यावे.

**१.संस्था नोंदणी प्रमाणपत्र. २. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र.**
**३. GST नोंदणी प्रमाणपत्र. ४. पॅन कार्ड. ५. सन २०२५-२०२६ चे आयकर भरणा प्रमाणपत्र.**
**६. GST सह दरपत्रक नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल.**
**७. नैसर्गिक व मानवनिर्मिती किंवा कोणत्याही आपत्तीमुळे बाजारातील सरासरी दरामध्ये वाढ झाल्यास निविदेतील दरपत्रकातील रक्कमेत वाढ करता येणार नाही. तसेच दराचे अधिक बिल सादर करता येणार नाहीत. तसे केल्यास बिल अपात्र ठरवून नियमानुसार बिल थांबविण्यात येईल.**
**८. सदरील साहित्य संस्थानच्या कार्यालयात पोहोच करणे आवश्यक राहील. याबाबतचा गाडीभाडा वेगळा मिळणार नाही तसेच Transport खर्च सुध्दा मिळणार नाही.**
**९. सदरील बाबीचे कोटेशनची संख्या कमी असल्यास कोटेशनच्या किंमती संदर्भात चर्चा करून पुढील निर्णय घेण्याचा अधिकार संस्थानला राहील.**
**१०. या कार्यालयाचे आदेश हे काम पूर्ण झाल्यानंतर आपोआप संपुष्टात येईल.**
**११. सीलबंद लिफाफे दि.१२.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मंदिर प्रशासनाच्या कार्यालयात उघडण्यात येतील. त्यावेळी आपण प्रत्यक्ष उपस्थित राहावे. उपस्थित न राहिल्यास जबाबदार आपण राहाल.**
**१२. सदरील निविदा व आदेश यामध्ये बदल/रद्द करण्याचे सर्व अधिकार विश्वस्त समिती, श्री रेणुकादेवी संस्थान माहूर यांना राहिल.**

**सदरील जाहिरात ही संस्थानच्या अधिकृत वेबसाईट www.shrirenukadevi.in वर आणि संस्थानच्या सूचना फलकावर लावण्यात आले आहे. अधिक माहिती करीता श्री रेणुकादेवी संस्थानचे कार्यालयात संपर्क साधावेत.**

स्वाक्षरित/-
**जेनित चंद्रा दोन्तुला (IAS)**
सहाय्यक जिल्हाधिकारी, किनवट
तथा सचिव, श्री रे.दे.सं.माहूर

# एका तरुणाकडून दोन गावठी पिस्टल व जीवंत काडतुस जप्त



नांदेड/प्रतिनिधी-स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी गुरुवारी आनंदनगर भागातील राज मॉलच्या पार्किंगमधून अटक केली. त्याच्या जवळून दोन गावठी पिस्टल, पाच जीवंत काडतुस व मॅगझीन पोलीसांनी जप्त केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी गावठी पिस्टल बाळगणाऱ्या आरोपींविरुध्द कारवाईचे सत्र सुरु केले आहे. आनंदनगर भागातील राज मॉल जवळ एका तरुणाच्या बॅगमध्ये गावठी पिस्टल असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक अतुल भोसले, सहाय्यक पोलीस निरिक्षक विठ्ठल घोगरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी राज मॉलच्या पार्किंगमध्ये छापा टाकुन गोपाल उर्फ बिट्टू सुदर्शन चव्हाण (वय २१), धंदा शिक्षण, रा.नमस्कार चौक, नांदेड यास अटक केली. पोलीसांनी त्याच्या जवळील बॅगेची तपासणी केली असता त्यामध्ये दोन गावठी पिस्टल, पाच जीवंत काडतुस व मॅगझीन पोलीसांना आढळून आली. गावठी पिस्टल संदर्भात गोपाळ उर्फ बिट्टू याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदरील गावठी पिस्टल साईसिंग उर्फ साईलाला दीपकसिंग गहेरवार रा.नमस्कार चौक,नांदेड व शेख शाहरुख उर्फ कबुतर शेख अजगर रा. खुदबेनगर चौरस्ता,नांदेड याच्याकडून खरेदी केल्याचे त्याने सांगितले. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इस्लापूर येथे बंद पडलेले ज्वारी, मका खरेदी केंद्र पूर्ववत सुरु

किनवट/प्रतिनिधी- इस्लापूरातील बंद पाडलेले ज्वारी आणि मका खरेदी केंद्र शुक्रवारपासून (५ जून) चालू करण्यात आले असून ८ जून सोमवारपासून किनवट येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. इस्लापूर येथील खरेदी केंद्र बंद पाडले होते. त्यामुळे भाजपा किसान मोर्चा नांदेड जिल्हा उत्तर चिटणीसांच्या मध्यस्थीने आदिवासी विकास महामंडळाच्या यवतमाळचे प्रादेशिक व्यवस्थापक बालाप्रसाद भडकमकर आणि किनवट स्थित उपप्रादेशिक व्यवस्थापक प्रफुल्ल सोयाम यांची ४ जून रोजी महत्वपूर्ण बैठक होऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

गोदाऊन उपलब्धतेवर विसंबून ज्वारी आणि मका खरेदीचे भवितव्य अवलंबून असणार आहे. गोदाऊन उपलब्ध नसल्यामुळेच इस्लापूर येथील खरेदी केंद्र सुरु होण्याला विलंब झाला होता. अगोदरच विलंबाने सुरू झालेल्या खरेदी दरम्यान व्यापाऱ्यांच्या धान्याला प्राधान्य देण्यात येत असल्याने काहींनी खरेदी केंद्र बंद पाडले. ३० जून पुर्वी ८०४ शेतकऱ्यांच्या धान्य खरेदीचे उद्दीष्ट्य पूर्ण करण्यासाठी किसान मोर्चा उत्तरचे जिल्हा चिटणीस उद्धवराव मुंडे यांनी प्रादेशिक व्यवस्थापक भडकमकर आणि उपप्रादेशिक व्यवस्थापक सोयाम यांच्याशी ४ जून रोजी किनवट येथे झालेल्या बैठकीत समन्वयाची भूमिका घेतल्याने आजपासून (शुक्रवार ५ जून) इस्लापूरचे खरेदी केंद्र पुन्हा सुरू केले आहे. ८ जूनपासून किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात तीन तोलकाटे लावले जाणार आहेत. बाजार समिती, मांडवा, अशा काही ठिकाणी गोदाऊन उपलब्ध झाल्याने खरेदी करण्यात येणार आहे. बुलडाणा अर्बन बँकेचे गोदाऊन रिकामेच आहेत. तहसीलदार यांच्याकडे मागणी करण्याची आवश्यकता आहे. प्रादेशिक व्यवस्थापक भडकमकर यांनी तर २५ जून पर्यंत ८०४ शेतकऱ्यांचे धान्य खरेदीचे लक्ष पूर्ण करण्याची हमी दिलीय. ३० जून ही भरडधान्य खरेदीची शेवटची तिथी असेल. वेळप्रसंगी १३ मे पुर्वी जेवढ्या शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी केलीय ती रद्द सुद्धा करण्यात येईल असा इशारा भडकमकरांनी दिलाय.

# विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न



नांदेड/प्रतिनिधी- नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदार संघ विधान परिषद निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवनच्या बैठक हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षण पथकाचे नोडल अधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांच्या उपस्थितीत रेणुकादास देवणीकर यांनी निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबी, मतदान केंद्रावरील जबाबदाऱ्या, मतदानाच्या दिवशीचे नियोजन तसेच निवडणूक आयोगाच्या निर्देशांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने हे देखील उपस्थित होते. या निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तहसीलदार यांची नियुक्ती करण्यात आली असून, इतर मतदान अधिकारी म्हणून नायब तहसीलदार, सहाय्यक महसूल अधिकारी तसेच इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशिक्षणा दरम्यान मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन देण्यात आले.

# मनोज पुसनाके यांना महाराष्ट्र नायक पुरस्कार प्रदान

मांडवी/प्रतिनिधी-कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण कार्य केल्याबद्दल पळशी येथील मनोज पुसनाके यांना राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नायक पुरस्कारा'ने नाशिक येथे अत्यंत उत्साहात सन्मानित करण्यात आले.

बी. एस. एफ. बहुद्देशीय संस्था अमरावती, उपेक्षित नायक न्यूज आणि सत कबीर बहुद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नाशिक येथील निलगिरी बाग परिसरातील धनलक्ष्मी बँकवेट हॉलमध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भूषण सरदार आणि आर्यमेघ सरदार हे होते. या राज्यस्तरीय सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. मनोज पुसनाके यांनी कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात दिलेल्या बहुमूल्य योगदानाची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार बहाल करण्यात आला.



CHANGE IN NAME

My (old name) is **PATHAN SANIYAKHANAM NAJEMKHAN** which now I am, changing as (new name) **SANIYA KHANAM FARHAN KHAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
Near Eidgah Ayesha Bag Nanded-431604
M No-8888628848

CHANGE IN NAME

My (old name) is **AMBHORE SANJAY** which now I am, changing as (new name) **SANJAY RANGRAO AMBHORE**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SANJAY RANGRAO AMBHORE**
R/o H.no.1-4-63, Govind niwas Phule nagar
Nanded-431602
M.No.-9421103839

# ८९ हजार रुपयांचा गुटखा जप्त

देगलूर/प्रतिनिधी- अवैध गुटखा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यास पोलीसांनी अटक केली असून त्याच्याकडून ८९ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

उमरगाव ते सावरगाव रोडवर शरद संजय जाधव (वय २८) रा.मुजळगा ता.देगलूर हा शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा गुटखा विक्री करीत असताना पोलीसांनी बुधवारी त्यास अटक केली. त्याच्याकडून ८९ हजार रुपयांचा गुटखा पोलीसांनी जप्त केला. याप्रकरणी पोलीस शिपाई मोहम्मद इम्रान यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन देगलूर पोलीस ठाण्यात शरद जाधव याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## मौजे मंगरुळ येथे सव्वा लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-मौजे मंगरुळ ता.हिमायतनगर येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सव्वा लाख रुपयाचे दागिणे चोरुन नेल्याची घटना घडली आहे. अविनाश अमृता घमेवाड (वय ३५) रा.मंगरुळ यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेला आहे.

# कृ.उ.बा.सभापतींवरील अविश्वास ठराव संदर्भात संचालकांची दि.१० रोजी विशेष सभा

किनवट/प्रतिनिधी- किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केल्यावरुन जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेत १० जून रोजी विशेषसभा बोलावून तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांवर प्राधिकृत अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवलीय, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सभेची तयारी आणि अनुषंगिक कार्यवाहीची जबाबदारी सोपवल्याचे किनवटच्या इतिहासात कदाचित पहिलीच घटना असावी. जवळपास वर्षभरात त्रैमासिक बैठका सुद्धा घेतल्या नसल्यामुळे कलम ७३ फ अंतर्गत कारवाईची तरतूद असल्यामुळे अंमलबजावणीच्या दृष्टीने पाऊले उचलली जाणार का? या बहूचर्चीत प्रकरणाकडे तमामांचे लक्ष लागून आहे.

१० जून रोजी सकाळी ११ वाजता किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांची विशेष सभा बोलावल्याचे १ जून रोजीच्या पत्रावरुन समजते. अविश्वास ठराव/विशेष सभा/१८१५/२६. दि.२७/०५/२०२६ च्या आदेशान्वये अधिनियम १९६३ चे कलम २३ नुसार प्राधिकृत अधिकारी म्हणून तहसीलदार यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. १४ संचालकांनी दाखल केलेल्या सभापतीविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावाच्या अनुषंगाने विशेष सभा होणार आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था म्हणा किंवा सहकार संस्था विभागाच्या वरिष्ठांमार्फत अशा वेळी अशा विशेष सभा घेतल्या जात होत्या परंतु यावेळी मात्र त्यांच्यावरही अविश्वास करून थेट जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रकरण हाताळले जात असल्याने लोकांचे आकर्षण वाढल्याचे पहायला मिळते. सहाय्यक निबंधकांकडे सभेची तयारी, सभेचा वृत्तांत लिहून वरिष्ठांकडे पाठवणे आणि अनुषंगिक कार्यवाहीची जबाबदारी सोपवलीय. संचालकांना नोटीस तामील करून नोटीस फलकावर नोटीस लावण्यासाठी समितीच्या सचिवांकडे कामकाज सोपवले आहे. संचालकांच्या म्हणण्यानुसार सभापतींनी ना मासिक बैठका ना त्रैमासिक सभा घेतल्या नाहीत अशावेळी उपसभापतींनी तरी सभा घेण्याचे अधिकार असतील तर वापरायला हरकत नव्हती. सचिव सतत गैरहजर असेल आणि तशी तरतूद असेल तर रेकार्ड रुमचा संबंधितांच्या उपस्थितीत पंचनामा करून सहाय्यक निबंधकांच्या मार्फत सभा घेता आल्या असत्या. सलग वर्षभर सभा घेतल्यागेल्या नसतील तर, संचालकांचेही संचालकत्व तर धोक्यात येणार नाही ना ?, जिल्हाधिकाऱ्यांनी कलम ७३ फ चा वापर करुन कारवाई केल्यास सोयीचे ठरते. या भ्रष्टाचाराचे मूळ हे गोकुंद्रा येथील जमीन विक्री पासून ते या आर्थिक घोटाळ्यापर्यंत दिसते. या अविश्वासावर १० जूनच्या सभेत ठराव पारित झाल्यानंतर पुन्हा दुसऱ्या सभापतीची निवड होणार की संचालक मंडळच बरखास्त होणार?, सचिवावर काय कारवाई होणार? आर्थिक घोटाळ्यातील रक्कमेची वसुली होणार की तेरी भी चूप और मेरी भी चूप होणार? या उलथापालथीतून नेमके काय बाहेर येणार? या बद्दल सर्वत्र चर्चा तर होणारच.

# संख्याबळ असताना घोडेबाजार कशासाठी?

## संजय राऊतांचा सत्ताधाऱ्यांना सवाल

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात सध्या सुरु असलेल्या विधान परिषदेत स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात रिक्त असलेल्या निवडणुकांमध्ये काल उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अचानक विरोधकांच्या उमेदवारांनी माघार घेतली. सत्ताधारी महायुतीकडे निवडणुका जिंकण्यासाठी पुरेसे संख्याबळ असताना भाजपला घोडेबाजार करण्याची गरज काय, असा सवाल शिवसेनेचे नेते खा.संजय राऊत यांनी उपस्थित केला.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी माघार घेतल्याने निर्माण झालेल्या राजकीय घडामोडींवरून ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी भाजप आणि महायुतीवर जोरदार टीका केली आहे. माध्यमांशी संवाद साधताना राऊत म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीत उमेदवारांच्या माघारीसाठी आणि काही जागा बिनविरोध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकणसह अन्य ठिकाणी उमेदवारांच्या माघारीमागे मोठ्या रकमेची देवाणघेवाण झाल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपकडे जिंकण्यासाठी आवश्यक संख्याबळ आणि यंत्रणा असताना बिनविरोध निवडणुका आणि उमेदवारांच्या माघारीसाठी एवढा आटापिटा का केला जात आहे? असा प्रश्न उपस्थित करत राऊत यांनी राज्यातील राजकारणाला कलंक लावणारा प्रकार सुरू असल्याची टीका केली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाचाही उल्लेख केला. एकीकडे देशवासियांना खर्चात बचत करण्याचा सल्ला दिला जातो, तर दुसरीकडे निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करण्यास मोकळीक दिली आहे का? असा खोचक सवालही त्यांनी केला. कोकण, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे उमेदवारांच्या माघारीसाठी कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाल्याचा दावा करत राऊत यांनी या प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणीही केली.




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपच्यावतीने आयोजित नाना-नानी पार्क येथे आयोजित कार्यक्रमात महापौर कविता मुळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी महापौर मंगला निमकर, मोहिनी येवनकर, सुषमा थोरात, नगरसेविका ज्योती कल्याणकर, मंगला धुळेकर, अनिता इंगोले, अपर्णा चितळे, छाया कळसकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# फारुख अहमद यांचे पुस्तक मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रगतीला नवी दिशा देणारे


## माजी न्या.युनूफ पटेल यांचे प्रतिपादन

नांदेड/प्रतिनिधी-देशातील मुस्लिम समाजाची परिस्थिती पाहता फारूक अहमद लिखित भीती आणि द्वेषाच्या काळातील मुस्लिमांचा राजकीय अजेंडा हे पुस्तक मुस्लिम समाजाच्या सामाजिक व राजकीय प्रगतीला नवी दिशा देणारे ठरणार असल्याचे प्रतिपादन माजी न्या.मोहम्मद युनूस पटेल यांनी केली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष फारूक अहमद लिखित भीती आणि द्वेषाच्या काळातील मुस्लिमांचा राजकीय अजेंडा या पुस्तकाच्या प्रमुख विषयावर नांदेड येथे महत्त्वपूर्ण वैचारिक आणि राजकीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. अब्दुल वहीद आणि अख़ील फारुकी यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी न्यायाधीश युनूस पटेल होते. या कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते तय्यब झफर, ज्येष्ठ पत्रकार अल्ताफ अहमद सानी यांच्यासह मान्यवर पाहुणे म्हणून निवृत्त न्यायाधीश शफाअतुल्लाह खान, नगरसेवक काझी नाफे, ॲड. शेख बिलाल (नगरसेवक), नगरसेवक राहुल सोनसळे, नगरसेवक सय्यद रिझवान, अशफाक हुसेन, मौलाना अब्दुलअझीम फलाही आणि सईद खान यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुरआन पठणाने झाली. त्यानंतर अब्दुल समी यांनी क्रांतिकारी गीत सादर करून उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. प्रास्ताविक करताना वहीदभाईंनी सांगितले की, फारूक अहमद यांच्या या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मुंबईतील आंबेडकर भवन येथे भव्य स्वरूपात झाले होते. या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यासह देशभरातील नामवंत पत्रकार, विचारवंत आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी न्यायाधीश मोहम्मद युनूस पटेल यांनी एसआयआर विषयाबाबत चिंता व्यक्त केली. या प्रक्रियेच्या संभाव्य परिणामांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. पश्चिम बंगाल, आसाम आणि तामिळनाडू येथील उदाहरणे देत मतदार यादी आणि नागरिकत्वाशी संबंधित प्रश्नांबाबत जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातही या संदर्भात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले, जेणेकरून नागरिकांना त्यांचे हक्क आणि कायदेशीर जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव होईल. मोहम्मद युनूस पटेल यांनी फारूक अहमद यांच्या राजकीय आकलनाचे, सामाजिक योगदानाचे आणि वैचारिक कार्याचे कौतुक करत त्यांचे पुस्तक सध्याच्या परिस्थितीत गंभीर चिंतनाला प्रवृत्त करणारे असल्याचे म्हटले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक, विचारवंत आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# माहूर तालुक्यात विनापरवाना शेतमाल व्यापारावर कारवाईचा इशारा

माहूर/प्रतिनिधी- शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण तसेच कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता कायम राखण्यासाठी माहूर तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापारी, संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दत्तराव मोहिते यांनी दिली.



महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारांचे नियमन करण्यात येते. मात्र, तालुक्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्या आवश्यक परवान्याशिवाय शेतमालाची खरेदी-विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी बाजार समितीने संबंधितांना सूचना देणारे पत्र जारी केले असून आता नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. पणन संचालकांनी ८ मे २०२६ रोजी तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने ११ मे २०२६ रोजी जारी केलेल्या सुधारित परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापार करण्यासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे माहूर तालुक्यात विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विकास व विनियमन अधिनियमातील कलम ६ (२) मधील सुधारित तरतुदींनुसार शेतमाल व्यापारासाठी परवाना आवश्यक आहे. तसेच शेतकरी व ग्राहक यांच्यातील थेट व्यवहार, खाजगी बाजारपेठ किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे होणाऱ्या व्यापारासाठीही कलम ५ (ड) अंतर्गत परवाना घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, परवानाधारक व्यापाऱ्यांकडून बाजार समितीकडून कोणतेही बाजार शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, कायद्यानुसार परवाना घेणे ही प्राथमिक आणि बंधनकारक अट राहणार आहे. शासनाने ५ जुलै २०१६ व ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार या नियमांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे सभापती दत्तराव मोहिते यांनी स्पष्ट केले.

# पर्यावरण दिनानिमित्त आ.केराम यांच्या हस्ते वृक्षारोपण

किनवट/प्रतिनिधी- एक पेड माँ के नाम, या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. आ.भीमराव केराम यांच्या हस्ते किनवट येथील महादेव मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश दिला. याप्रवेळी उपस्थित सर्वांनीच आपल्या आईच्या सन्मानार्थ किमान एक वृक्ष लावून त्याचे पुढील काळात उत्तम रीतीने संगोपन करण्याचा सामूहिक संकल्प करून वृक्षारोपण केले हे विशेष.



आज लावलेले एक झाड म्हणजे उद्याच्या भावी पिढीसाठी जीवन संजीवनी ठरणार आहे. प्रत्येकाने पर्यावरण रक्षणाची ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे असे आ. केराम यांनी समारोप प्रसंगी सांगितले. या उपक्रमाला भाजपाचे सर्वच स्तरांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास प्रामुख्याने खालील आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा युवा मोर्चा व महिला मोर्चाचे प्रतिनिधी, बूथ प्रमुख आणि शक्ती केंद्र प्रमुख, विविध आघाड्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांचाही वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग दिसून आला.

# मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपी सोहेलखान उर्फ चिंधी फेरोजखान पठाण यास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचारी हे गुरुवारी नांदेड शहरात गस्त घालीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपी हा म्हाळजा व माळटेकडी भागात फिरत आहे. पोलीसांनी तात्काळ त्या भागात जावून आरोपीचा शोध सुरु केला होता. मोक्का गुन्ह्यातील पोलीसांना हवा असलेला फरार आरोपी सोहेलखान उर्फ चिंधी फेरोजखान पठाण रा.बालाजीनगर, हिंगोली नाका,नांदेड यास पोलीसांनी अटक केली. त्याला पुढील तपासासाठी विमानतळ पोलीस स्टेशनच्या सुपूर्द करण्यात आले आहे.

# नदी स्वच्छता मोहिमेत मंत्र्यांच्या हाती लागले गंजलेले पिस्तूल

नाशिक-नाशिक शहरातील उंटवाडी परिसरातील नंदिनी नदीत राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेत नदीपात्रातून गंजलेल्या अवस्थेतील पिस्तूल आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

नंदिनी नदीतील गाळ व कचरा काढण्याचे काम सुरू असताना हे पिस्तूल आढळले. स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या मंत्री गिरीश महाजन यांच्या नजरेस ही बाब पडताच उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये एकच चर्चा सुरू झाली. नाशिकमध्ये कुंभमेळा होणार आहे. त्यानिमित्त विकासाची अनेक कामे सुरु आहेत. नदी स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. या दरम्यान नदीपात्रात शस्त्र आढळल्याची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांना तातडीने पाचारण करण्यात आले. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी गंजलेले पिस्तूल ताब्यात घेतले आहे. हे पिस्तूल नेमके कोणत्या प्रकारचे आहे, ते वापरण्यायोग्य आहे की नाही तसेच ते कायदेशीर की बेकायदेशीर आहे, याबाबत तपास सुरू करण्यात आला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, अज्ञात व्यक्तीने हे पिस्तूल नदीपात्रात फेकून दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच एखाद्या गुन्ह्याशी या शस्त्राचा संबंध आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत. पिस्तूल नदीत कधी, कसे आणि कोणत्या उद्देशाने फेकण्यात आले, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी चौकशीची चक्रे फिरवली आहेत. एका मंत्र्यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेदरम्यान नदीपात्रात घातक शस्त्र सापडल्याने नाशिक शहरात या घटनेची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, पिस्तूलाचा उगम आणि त्यामागील कारण शोधण्यासाठी पोलीस सखोल तपास करत असून तपासानंतरच या प्रकरणाचे खरे स्वरूप स्पष्ट होणार आहे..

# भोकर तालुक्यातील ६३ ग्रामपंचायतीच्या आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन

भोकर/प्रतिनिधी-राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तालुक्यातील ६३ ग्रामपंचायतीच्या आरक्षणा सोडतीसाठी विशेष ग्रामसभा बोलावून नेमून दिलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत आरक्षण काढण्यात येणार आहे.

आरक्षण सोडत प्रत्येक गावात सकाळी १० वाजता व दुपारी ३ वाजता काढण्यात येईल. ९ जून रोजी नारवट, किनी, धावरी खु., बोरगाव, थेरबन रेनापूर दिवशी खु., पोमनाळा, चीदगिरी, भुरभुशी, पाळज, देवठाणा, पाकी, मातुळ, खडकी राहटी बु. बल्लाळ, बेंद्री, लगळुद, धारजणी, कोळगाव खु.१० जून रोजी लामकानी, नांदा बु.रावणगाव, हाळदा, आमदरी, रिठा पांडुरगा, गारगोटवाडी (पा.), धावरी बु.सोमठाणा, सोनारी, कांडली, पिंपळ ढव, गारगोटवाडी, दिवशी, हाडोळी, ११ जून रोजी धानोरा, डौर, कामनगाव, सावरगाव मेट, बटाळा, किनाळा नांदा प, जांभळी, जाकापूर ईळेगाव, वाकद, खरबी, समंदरवाडी, १२ जून रोजी मोघाळी, सायाळ, भोशी, बेंबर, नागापूर, आमठाणा, डोरली, महागाव, बोरवाडी, जामदरी, हसापूर, ताटकळवाडी, रायखोड, सावरगाव माळ आदी ६३ ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत विशेष ग्रामसभेत काढण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी वेळेवर उपस्थित रहावे अशी सूचना तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी काढली आहे.

# ४० किलोमीटर रस्त्यासाठी शासनाकडून ६० कोटी रुपये मंजूर

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील बेरळी - नारनाळी-चिवळी- होकर्णा- तांदळी- जांभळी-केरुर- पाळा- चोंडी ते तुपदाळ या ४० किलोमीटर रस्त्यासाठी आ. डॉ. तुषार राठोड यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून जवळपास ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे सन २०२६ मध्ये १३ ग्रामीण रस्ते अद्ययावत होणार आहेत. हा निधी मिळाल्यामुळे संबंधित गावातील नागरिकांनी आनंदोत्सव साजरा केला आहे.

तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची दुरावस्था झाली होती. त्यामुळे दळणवळण सुलभ व्हावे यासाठी आ. डॉ. राठोड यांनी सन २०२५ मध्ये बेळी - नारनाळी - चिबळी - होकर्णा - तांदळी - जांभळी - केरुर-पाळा - चोंडी ते तुपदाळ या ४० किलोमीटर रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याची मागणी केली होती. त्यानंतर राज्यशासनाने भरीव असा ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. त्यानंतर २०२५-२६ मध्ये तांदळी पर्यंत रस्त्याचे काम झाले आहे. उर्वरित काम तातडीने पूर्ण केल्यास हा रस्ता संबंधित गावांना वाहतुकीसाठी खुला होणार आहे. तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत २६.६८ किलोमीटर रस्त्याच्या कामांना प्रशासकीय मान्यतेसह निधी मंजूर करण्यात आला आहे. सन २०२६ मध्ये ही १३ ग्रामीण रस्ते अद्ययावत होणार आहेत.

पान १ वरुन

## पंचशील प्रतिष्ठानच्या चौथ्या...

हेतूने नांदेड शहरातील पंचशील प्रतिष्ठान च्या वतीने चौथा सामूहिक बौद्ध विवाह मेळावा संपन्न झाला. भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भारतीय बौद्ध महासभेचे सा. ना.भालेराव, सुरेश लोकडे यांच्या हस्ते मंगल परिणय विधी घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या विवाह मेळाव्यासाठी उद्घाटक म्हणून मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, अध्यक्ष म्हणून बीएसएनएलचे उपमहाप्रबंधक आ.बी.मादळे, स्वागताध्यक्ष म्हणून छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी अभियंता अशोकराव येरेकर विशेष अतिथी म्हणून प्रफुल्ल सावंत, रमेश सोनाळे, बापूराव गजभारे, मनीषभाऊ कावळे, पंढरीनाथ बोकारे,इंजि.प्रशांत इंगोले, सुभाष काटकांबळे, आशाताई येरेकर, अनिताताई इंगोले, दादासाहेब शेळके, गणपतराव गायकवाड, हौसाजी वारघडे, इंजि. वसंत वीर, इंजी. अनिलकुमार आठवले, इंजिनीयर यशवंतराव गच्चे, डॉ. दिलीप फुगारे, महेंद्र कावळे, विजय डोंगरे, एम. डी. थोरात, इंजि. अशोक गायकवाड, संभाजी सोनकांबळे इ.आदींची प्रमुख उपस्थिती होती. या विवाह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी संयोजक सेवानिवृत्त अभियंता भरतकुमार कनिंदे, भीमराव धनजकर, आर. बी.मादळे, भगवानराव धबडगे, यशवंतराव उबारे, ॲड.गौतमराव कांबळे, प्रशांत ठमके तसेच कोंडीबा वासाटे, वसंत वीर, विजय रावळे, प्रेमदास घुले, गुणवंत भगत, विजय पोपलवार, टि.पी.वाघमारे, आर.सी.कांबळे,मिसाळे सर, अशोकराव गायकवाड, डी.डी.भालेराव, अनिलकुमार आठवले, रमाबाई पाटील, सुनीता कानिंदे, कुसुम धोटे, जयश्री भगत, निर्मला नरवाडे, दिक्षाताई नांगरे, सुनीता वासाटे, प्रतिमा भगत, पुष्पा भरणे, शैलजा लोणे, विमल किर्तने,मंदा पाटील, जनाबाई पोपलवार आदींनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४